# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

**प्रेसनोट क्र.३९४ दिनांक १८/०४/२०२०**

# पालघर जिल्हयात मॉर्निंग वॉक करिता घराबाहेर पडणा-या २३७ नागरीकांवर गुन्हे दाखल

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (कोवीड-१९) चा प्रादुर्भाव रोकण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० रोजी पासुन लागु करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोकण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणुन जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरीकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे. त्याकरिता पालघर जिल्हयातील कार्यक्षत्रामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१)(३) प्रमाणे मनाई आदेश पारीत करण्यात आले आहेत. त्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी पालघर यांचे कडील क्र. गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/ एस.आर.१७/२० जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर यांचे कडील मनाई आदेश पारित झाले आले आहेत.

पालघर जिल्हा पोलीस दलाकडुन सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केलेली आहे. दिनांक १७/०४/२०२० रोजी मनाई आदेशाचे उल्लघंन करुन मॉर्निग वॉक करिता घराबाहेर पडणा-या १८८ पुरुष व ८९ महीला यांचेवर कारवाई करण्यात आली आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | पुरुष | महिला |
|---|---|---|---|
| १ | माणिकपुर पोलीस ठाणे | ३३ | ०३ |
| २ | वालीव पोलीस ठाणे | १२ | ०७ |
| ३ | नालासोपारा पोलीस ठाणे | ४३ | १६ |
| ४ | तुळींज पोलीस ठाणे | ०२ | ०० |
| ५ | विरार पोलीस ठाणे | ६६ | २२ |
| ६ | अर्नाळा पोलीस ठाणे | ३२ | ०१ |
| एकुण | | १८८ | ४९ |

**मी गौरव सिंग, पोलीस अधीक्षक, पालघर, पालघर जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करतो प्रशासनाने दिलेल्या सुचनाचे नागरिकांनी तंतोतंत पालन करुन प्रशासनास सहकार्य करावे. अन्यथा आपणास सुध्दा अशा कारवाई सामोरे जावे लागेल.**

Scanned by CamScanner